# महाराष्ट्र शासन
# शिक्षण सहसंचालक (उच्च शिक्षण)

१७, डॉ.आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे-०१

Web:www.jdhepune.info E_mail ID- admin@jdhepune.info

फोन नं.०२०-२६१२७८३३ फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

क्र.ससं/उशि/पुवि/१.१०/पदनिश्चिती/कार्यशाळा/२०२२/२५०६ दि.२२-११-२०२२

प्रति,
प्राचार्य/प्राचार्या,
सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालये,
पुणे/अहमदनगर/नाशिक.

विषय:- सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दि.०१ ऑक्टोबर, २०२१ व दि.०१ ऑक्टोबर, २०२२ च्या विद्यार्थी संख्येवर आधारीत शिक्षक आणि शिक्षकेतर पदांचा आढावा...

संदर्भ:- या कार्यालयाकडील समपत्र क्र.३२१५, दि.२८-१०-२०२२.

उपरोक्त विषयाचे संदर्भात कळविण्यात येते की, अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील दि.०१ ऑक्टोबर, २०२१ व दि.०१ ऑक्टोबर, २०२२ च्या विद्यार्थी संख्येवर आधारावर अनुज्ञेय होणाऱ्या शिक्षक आणि शिक्षकेतर पदनिश्चितीच्या शिबीराचे दि.०१ ते ०४ नोव्हेंबर, २०२२ या कालावधीत आयोजन करण्यात आलेले होते.

सदरहू शिबीरामध्ये बहुतांशी महाविद्यालयांनी (१) तपासणी सूचीनुसार परिपूर्ण माहिती, (२) शैक्षणिक वर्ष २०२२-२३ ची प्रवेश प्रक्रिया सुरु असल्याने विद्यार्थी संख्येची व कार्यभाराच्या परिगणनेची माहिती, (३) विद्यापीठाने प्रमाणित केलेली विद्यार्थी संख्या इ. परिपूर्ण माहिती सादर न केल्याचे निदर्शनास आलेले आहे.

यास्तव दि.०१-१०-२०२१ व दि.०१-१०-२०२२ ची परिपूर्ण माहिती कशाप्रकारे सादर करावी, याबाबत खालील दिलेल्या वेळापत्रकानुसार दूरदृश्य प्रणालीद्वारे जिल्हानिहाय महाविद्यालयांच्या बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी सदरहू बैठकीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य व संबंधित काम पाहणारे अधिकारी/कर्मचारी यांनी उपस्थित राहणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | जिल्हयाचे नाव | दिनांक व वेळ |
|---|---|---|
| १. | पुणे शहर | २३-११-२०२२ रोजी स.११.०० वा. |
| २. | पुणे ग्रामीण | २३-११-२०२२ रोजी स.१२.१० वा. |
| ३. | अहमदनगर | २४-११-२०२२ रोजी स.११.०० वा. |
| ४. | नाशिक | २४-११-२०२२ रोजी स.१२.१० वा. |

सदरहू बैठकीची लिंक बैठकीपूर्वी महाविद्यालयाच्या ई-मेलवर पाठविण्यात येईल.

(डॉ.किरणकुमार बोंदर)
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग पुणे १.